**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ८ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा रेपो दर पाच पूर्णांक २५ टक्क्यांवर कायम.**
2. **पश्चिम आशियातील युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात तेजी, कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण.**
3. **आजपासून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह विविध प्रबोधनात्मक उपक्रमांनी राज्यभर साजरा होणार.**
4. **डॉ.गिरीश गांधी यांच्या नेतृत्वातील विदर्भ साहित्य संघाची कार्यकारिणी जाहीर.**

---------------------------------------

भारतीय रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात कोणताही बदल केला नसून, तो पाच पूर्णांक २५ टक्के इतका कायम ठेवला आहे. मुंबईत बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती दिली. विकसित होत असलेल्या स्थूल-आर्थिक आणि वित्तीय घडामोडी तसंच भविष्यातील दृष्टिकोनाचं सविस्तर मूल्यांकन केल्यानंतर, समितीने रेपो दर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. परिणामी, एसटीएफ दर पाच टक्के, तर एमएसएफ दर आणि बँक दर साडे पाच टक्क्यांवर कायम असल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं. २०२६-२७ या वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादनाची वाढ सहा पूर्णांक नऊ टक्के राहण्याचा अंदाज त्यांनी वर्तवला. मागील आर्थिक वर्षात ही वाढ सात पूर्णांक सहा टक्के होती. नजीकच्या काळात अन्नधान्याच्या किमतींबाबतची स्थिती समाधानकारक राहील, असंही त्यांनी सांगितलं.

---------------------------------------

पश्चिम आशिया

इराणबरोबरच्या दोन आठवड्यांच्या सशर्त युद्धविरामाची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. होर्मुझच्या सामुद्रधनीतून सागरी वाहतुकीला परवानगी देण्याची अट ट्रम्प यांनी घातली आहे. मात्र, या युद्धविरामावर द्विपक्षीय सहमती असायला हवी, असं ट्रम्प यांनी समाज माध्यमावर म्हटलं. हा संघर्ष आता थांबवण्याच्या जवळ येऊन पोहोचल्याचे संकेतही ट्रम्प यांनी दिले. दुसरीकडे इराणवरचे हल्ले थांबवल्यास इराण युद्धविरामासाठी सहमती देईल, असं इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास

अराघची यांनी म्हटलं आहे. दोन आठवड्यांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाणार असल्याचंही ते म्हणाले. इराणबरोबरच्या दोन आठवड्यांचा युद्धविरामाला इस्रायलनेही पाठिंबा दिला आहे. मात्र, हिजबोल्ला संघटनेबरोबरच्या संघर्षामुळे लेबनॉनबरोबर मात्र युद्धविराम करता येणार नसल्याचंही इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी स्पष्ट केलं आहे.

---------------------------------------

शेअर बाजार

इराणबरोबरच्या युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये २ हजार ८०० पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही ८०० पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली. दरम्यान, युद्धविरामानंतर जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत मात्र मोठी घसरण झाली. ब्रेंट क्रूड तेल १३ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी घसरून ९४ डॉलर ७७ सेंट प्रतिबॅरल इतकं झालं आहे. तर अमेरिकेत निर्यात होणारं तेल ९१ डॉलर ११ सेंट प्रतिबॅरल इतकं झालं आहे.

---------------------------------------

इक्विनिक्स एमबी३ डेटा सेंटर

विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणीदरम्यान बँडविड्थची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. विशेषतः शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर अचानक वाढणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकमुळे प्रणाली कोलमडण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असायची. अशा परिस्थितीत डेटा सेंटरमधील प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तत्काळ बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, अस  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल. त्यांच्या  हस्ते वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स कंपनीच्या एमबी ३ डेटा सेंटरच उद्घाटन करण्यात आल, त्यावेळी ते बोलत होते. इक्विनिक्स ही जगातील सर्वात मोठी डेटा सेंटर आणि इंटरकनेक्शन सेवा देणारी कंपनी असून, ३६ देशांतील ७७ महानगरांमध्ये २८० डेटा सेंटर्सचे जाळे कंपनीकडे आहे. भारतातील इक्विनिक्सचे पूर्णतः स्वतःच्या मालकीचे आणि नव्याने उभारलेले एमबी3 हे पहिले डेटा सेंटर आहे. ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीने यवतमाळ इथं उभारण्यात आलेल्या २६ पूर्णांक ६ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे.

---------------------------------------

मंत्री डॉ.अशोक वुईके

आदिवासी बहुल गडचिरोली, गोंदिया, यवतमाळ आदी जिल्ह्यांत सध्या धान कापणी सुरू असताना धान उत्पादक शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम कराव, तसच शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळाच्या योजनांमध्ये महिलांच्या बचत गटांना आणि  युवकांना विशेष प्राधान्य देण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके यांनी दिले. धान नुकसानीबाबत मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

---------------------------------------

गाळमुक्त धरण

राज्य शासनाने 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' तसेच नाला खोलीकरण, रुंदीकरण या महत्त्वपूर्ण योजनांना कायमस्वरूपी स्वरूप देण्याचा निर्णय घेतला आहे. याच्या अंमलबजावणीसाठी शासनाने २० कोटी २२ लाख ३२ हजार ८३२ रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या निधीच्या माध्यमातून विविध जलसाठ्यांमधील गाळ काढून तो शेतकऱ्यांच्या शेतात पसरविण्यासाठी प्रोत्साहन दिल जाणार आहे.

---------------------------------------

खरात कोठडी

भोंदू बाबा अशोक खरातला आणखी एका बलात्कार प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी नाशिक जिल्हा न्यायालयाने दिली आहे. २०२० पासून धार्मिक विधींच्या नावाखाली आपलं वेळोवेळी लैंगिक शोषण त्याने केल्याचा आरोप तक्रारदार महिलेनं केला आहे. खरात विरुद्धच्या आरोपांची चैकशी करणाऱ्या विशेष तपास पथकानं आज त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केलं.

---------------------------------------

समता सप्ताह

दिनांक 8 ते 14 एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह, विविध प्रबोधनात्मक आणि समाजोपयोगी उपक्रमांनी राज्यभर साजरा करण्यात येणार आहे.  या सप्ताहात दररोज जनजागृती पर कार्यक्रमांचं  आयोजन करण्यात येणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावं असं आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशनी तेलगोटे यांनी केलं. नागपुरात सामाजिक समता सप्ताहादरम्यान घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इथं आयोजित पत्रकार परिषदेत तेलगोटे बोलत होत्या. भंडारा जिल्ह्यात या सप्ताहा निमित्त  वक्तृत्व, निबंध, लघुनाट्य स्पर्धा, महिला मेळावे, व्याख्यान,

प्रबोधनपर कार्यक्रम, रक्तदान शिबिर आणि स्वच्छता अभियान आदी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

---------------------------------------

जनगणना

भंडारा जिल्ह्यात १६ मे ते १४ जून या कालावधीत होणाऱ्या राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आज प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या प्रशिक्षणामध्ये एकूण ३६ प्रशिक्षक सहभागी झाले होते. जनगणना प्रक्रियेतील महत्त्वाचे मुद्दे, माहिती संकलनाची पद्धत, अचूकता राखण्याचे उपाय याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आलं . जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय उपक्रम असून, तो अचूक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करण्याचं आवाहन यावेळी जिल्हाधिकारी सावंत कुमार यांनी केलं.

---------------------------------------

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाची निवडणूक झाल्यानंतर काल डॉ.गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेतील विदर्भ साहित्य संघाची सन 2026 ते 2031 साठीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. संघाच्या उपाध्यक्षपदी अरुणा सबाने, बाळ कुळकर्णी आणि चंद्रकात लाखे यांची नियुक्ती करण्यात आली असून सरचिटणीसपदी विलास मानेकर तर कोषाध्यक्षपदी माधुरी साकुळकर राहतील. ही कार्यकारिणी पुढील पाच वर्षासाठी विदर्भ साहित्य संघाचा कार्यभार सांभाळेल, असं विदर्भ साहित्य संघाचे नवनियुक्त अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी सांगितलं आहे.

---------------------------------------

नौकाविहाराचा शुभारंभ

गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध जलाशय पर्यटनासाठी पुन्हा सज्ज झाला असून खासदार प्रफुल पटेल यांच्या हस्ते नौकाविहाराला आज प्रारंभ करण्यात आला. डोंगर रांगांनी वेढलेल्या या जलाशयात आता श्रीनगरच्या दल तलावासारख्या शिकारा बोटींसह विविध बोटींची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे जलपर्यटन प्रेमींमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

---------------------------------------

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायन्टंस यांच्यात सामना होणार आहे. दिल्लीत अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

---------------------------------------

हवामान

हवामान!विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाचा प्रभाव अजूनही कायम असल्याने कमाल तापमानात झालेली घट कायम आहे, मात्र उकाडा  मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काल  सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं  38 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं, तर नागपुरात 37. 4 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. येत्या 12 तारखेपर्यंत हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

---------------------------------------